**N.C.R.B (एन.सी.आर.बी)**

**I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)**

## FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** लातूर **P.S.(ठाणे):** चाकुर

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0321 **Year (वर्ष):** 2026

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनाक आणि वेळ):** 16/06/2026 02:07

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** सोमवार **Date From (दिनाक पासून):** 15/06/2026
   **Time Period (कालावधी):** पहर 5 **Date To ( दिनाक पर्यंत):** 15/06/2026
   **Time From (वेळेपासून):** 14:54 बजे
   **Time To (वेळेपर्यंत):** 14:54 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनाक ):** 16/06/2026 **Time (वेळ):** 01:40 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 005

**Date & Time (दिनाक आणि वेळ):** 16/06/2026 01:40 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**

पश्चिम, 25 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** हनुमान मंदिराचे जवळ रोडवर,मौजे तळणी तारेणापूर जि लातूर

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): चंद्रकांत सिद्राम माळी

(b) **Father's Name** (वडील चे नाव) : सिद्राम माळी

(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1978

(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):

**Date of Issue** (दिल्याची तारीख):

**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | लाचलुचपत प्रतिबधक विभाग, लातू,चाकुर,लातूर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | लाचलुचपत प्रतिबधक विभाग, लातू,चाकुर,लातूर,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):

(j) **Phone number** (फोन नं.):

**Mobile** (मोबाइल नं.): 91-9823716030

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | गौसपाशा चाँद शेख | | वडील का नाम : चाँद शेख | 1. उंबडगा ता औसा जि लातूर , चाकुर,लातूर,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 10,000/ रूपये रोख रक्कम | 10,000.00 |

**10 Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**
10,000.00

**11.Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

**12.First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्याद दिंनाक 16/06/2026

मी चंद्रकांत सिद्राम माळी वय 48 वर्श, व्यवसाय -नोकरी, पद -पोलीस उप अधीक्षक, नेमणुक - लाचलुचपत प्रतिबधक विभाग, लातूर, मो नंबर -9823716030

सरकार तर्फे फिर्याद देतो की, मी लाचलुचपत प्रतिबधक विभाग, लातूर येथे 1 जुन 2026 पासून पोलीस उप अधीक्षक या पदावर कार्यरत आहे.

मी आज दि.15/06/2026 रोजी कार्यालयात हजर असताना तक्रारदार श्री. संतराम तुकाराम कोते यांनी लाप्रवि, लातूर कार्यालयात हजर येवून एका लोकसेवकाविरुध्द लाच मागणीची तक्रार असलेबाबत सांगितले. त्यावरून मी सापळा कारवाई आयोजीत करण्याकरीता दोन षासकीय पंच आवष्यक असल्याने मा.आयुक्त,महानगरपालीका लातूर षहर यांचे नावे पत्र देवून त्यांच्या कार्यालयाकडील दोन कर्मचारी गोपनीय कारवाई करीता पंच म्हणून उपलब्ध करून घेतले.

दिंनाक 15/06/2026 रोजी दोन्ही पंच हे कार्यालयात हजर आले. आम्ही सापळा पथकातील सदस्य यांना व पंचांना सदरचे ईसम हे तक्रारदार असल्याचे सांगुन त्यास त्यांचे नाव व पत्ता विचारला असता तक्रारदार यांनी त्यांचे नांव श्री.संतराम तुकाराम कोते, वय-46 वर्शे, व्यवसाय-षेती, रा. धवेली, पोस्ट तळणी, ता. रेणापूर जि. लातूर असे सांगीतले. त्यानंतर तक्रारदार यांनी त्यांची तोंडी तक्रार सांगितली. सदरची तक्रार पोकॉ/1256 गंभीरे यांनी लाचलुचपत प्रतिबधक विभाग येथील लॅपटॉपवर टंकलिखीत केली ती पुढील प्रमाणे आहे. " मी वरील ठिकाणचा राहणारा असुन षेती करून कुटूंबाचा उदरर्निवाह करतो. माझा चुलत भाऊ प्रकाष लक्ष्मण कोते रा.धवेली ता. रेणापूर यांचे नावे मौजे सय्यदपूर ता. रेणापूर .जि. लातूर येथे षेत गट नं. 11 मध्ये 3.5 एकर षेत जमीन आहे. सदर षेत जमीनीमध्ये महात्मा गांधी राश्ट्रीय रोजगार हमी योजने अंतर्गत मंजुर झालेल्या सिंचन विहीरीचे बांधकाम सन 2024 मध्ये पुर्ण करण्यात आले आहे. सदर बांधकाम केलेल्या विहिरीच्या बिलाची रक्कम अद्याप पर्यंत भावाचे खात्यावर जमा झालेली नाही. मी नेहमी कामानिमित्त रेणापूर येथे येत-जात असतो म्हणून माझा भाऊ प्रकाष कोते याने मला विहीरीच्या बिलाबाबत पंचायत समिती रेणापूर येथे विचारणा करण्यास सांगितले होते. म्हणून मी विहीर बांधकामाचे बिलाच्या हफ्त्या बाबत विचारणा करण्याकरिता पंचायत समिती, रेणापूर येथील सिंचन विहिरीचे काम पाहणारे षेख साहेब यांना दिंनाक 12/06/2026 रोजी भेटलो असता, त्यांनी मला बिलाचा हफ्ता भावाचे खात्यावर जमा करण्यासाठी लागणाÚया पुर्णत्वाच्या दाखल्यावर सही करण्यासाठी 10,000/- रूपयेची मागणी केली. त्यावर मी घरी येवुन भाऊ प्रकाष कोते यांचेषी चर्चा केल्यानंतर मला षेख साहेब मागत असलेली रक्कम ही लाच असल्याची खात्री झाली. माझा भाऊ प्रकाष कोते यास षेख साहेब यांना लाच देण्याची बिलकुल इच्छ नाही. माझा भाऊ प्रकाष कोते हा अषिक्षीत असल्याने व त्याला या सर्व गोश्टींचे ज्ञान नसल्याचे भाऊ प्रकाष यांनी मला सांगितले. त्यावरून मी त्यास सोबत घेऊन लाचलुचपत प्रतिबधक विभाग, लातूर कार्यालयात त्याचेवतीने तक्रार देण्यासाठी आलो आहे. मी आजरोजी भाऊ प्रकाष कोते यांचे वरील कामासाठी पंचायत समिती, रेणापूर येथील षेख साहेब यांची भेट घेणार आहे. सदर भेटीदरम्यान षेख साहेब यांनी स्वतः अथवा इतरांमार्फत लाचेची मागणी करून स्वतः अथवा इतरामार्फत स्विकारल्यास त्यांचेविरूध्द कायदेषीर कार्यवाही होणेस विंनती आहे. माझा षेख साहेब यांचेषी कसलाही आर्थिक देवाण घेवाणीचा व्यवहार नाही अथवा माझे त्यांचेषी काही वैर नाही.''अषा आषयाची तक्रार दिली असुन सदर तक्रार टंकलिखीत केल्यानंतर त्याची प्रिंट काढून वाचुन पाहुन तक्रारदार, मी व दोन्ही पंचानी तक्रारीवर सहया केल्या आहेत.

त्यानंतर दिंनाक 15/06/2026 रोजी 11.00 वाजता आम्ही, तक्रारदार, दोन्ही पंच व सापळा पथक असे सापळा कारवाई करण्याकरिता षासकीय वाहन क्रमांक MH-24-BX-4015 चे चालक पोह/210 क्षीरसागर यांचेसह सापळा कारवाईकरीता आवष्यक असलेल्या सर्व साहित्यासह ला.प्र.वि.कार्यालय लातूर येथून रवाना होवून

सेलू पाटी, खरोळा रोड ता. रेणापूर येथे 11.45 वाजता पोहोचलो व आमचे वाहन रोडचे आडबाजूस लावले.

तक्रारदार श्री.संतराम तुकाराम कोते यांचे वर नमुद कामासाठी पंचायत समिती, रेणापूर येथील लोकसेवक षेख यांनी तक्रारदार यांना लाचेची मागणी केली आहे अगर कसे? याची पंचासमक्ष लाचेच्या मागणीची पडताळणी करण्याचे ठरविण्यात आले. तक्रारदार श्री.संतराम तुकाराम कोते यांचे कामासंदर्भात व लाचेच्या मागणी संदर्भात तक्रारदार श्री. संतराम तुकाराम कोते व पंचायत समिती, रेणापूर येथील लोकसेवक षेख यांचेत काय बोलणी होते ते डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरमध्ये ध्वनीमुद्रीत करण्याचे ठरवुन मी दोन्ही पंच व तक्रारदार यांना डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर बाबत सविस्तर माहिती देवुन त्यामध्ये नविन मेमरीकार्ड दोन्ही पंचासमक्ष डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरमध्ये टाकुन त्यात पुर्वीचे कोणतेही संभाषण ध्वनीमुद्रीत झाले नसले बाबत दोन्ही पंचांना खात्री करुन देण्यात आली.

लाच मागणी पडताळणी पुर्वी तक्रारदार, दोन्ही पंच व सापळा पथकातील सदस्य यांना मी योग्य त्या सुचना दिल्या. तक्रारदार श्री.संतराम तुकाराम कोते यांनी दिलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने लाच मागणीची पडताळणी करण्याचे ठरविण्यात आले. त्यापुर्वी लोकसेवक षेख हे सध्या कोठे आहेत याची माहिती घेण्याकरिता तक्रारदार यांचे मोबाईल फोन वरून लोकसेवक षेख यांचे मोबाईलवर फोन केला असता, लोकसेवक षेख यांनी तक्रारदार यांना ग्रामपंचायत खरोळा ता. रेणापूर येथे येण्यास सांगितले. त्यावरून पो.अं./1759 कोंडरे यांचे मदतीने 12.52 वाजता डिजीटल व्हॉइस रेकॉर्डर चालू करून तक्रारदार यांचे गळ्यात अडकावुन तक्रारदार यांना पंच क्रमांक 01 मनोज गोजमगुंडे यांच्या सोबत लोकसेवक षेख यांची भेट घेण्यासाठी ग्रामपंचायत कार्यालय, खरोळा ता. रेणापूर येथे रवाना केले. मी, पंच क्र. 02 फरदीन पठाण व सापळा पथकातील ईतर सदस्य वाहनामध्ये थांबुन राहीलो.

त्यांनतर अंदाजे 13.11 वाजण्याच्या सुमारास तक्रारदार संतराम कोते व पंच क्रमांक 01 मनोज गोजमगुंडे हे परत सापळा पथकाच्या वाहनाजवळ आले असता पो.अं.1759 कोंडरे यांचे मदतीने तक्रारदार यांच्याकडील व्हॉईस रेकॉर्डर बंद करण्यात आला. मी, पंच क्रं. 01 मनोज गोजमगुंडे यांना ते तक्रारदार यांचे सोबत लोकसेवक षेख यांची भेट झाल्यानंतर तक्रारदार यांचे कामासंदर्भात व लाचेच्या रक्कमे संदर्भात काय बोलणी झाली याबाबत विचारणा केली असता पंच क्रमांक 01 मनोज गोजमगुंडे यांनी सांगितले की, "मी व तक्रारदार संतराम कोते असे मिळुन ग्रामपंचायत कार्यालय, खरोळा येथे गेलो असता, तक्रारदार यांनी ग्रामपंचायत कार्यालय समोर थांबलेल्या फिक्कट हिरव्या रंगाचा षर्ट व गडद हिरव्या रंगाची पॅन्ट घातलेला ईसमाकडे डोळ्याने इषारा करुन सदर इसम हे लोकसेवक षेख असल्याचे सांगीतले. तक्रारदार यांनी त्यांचेषी कामासंदर्भात चर्चा केली असता, तक्रारदार संतराम कोते म्हणाले...कसं कसं हाय सांगा मला?....गोविंदाला बोलल्यालं काय काय म्हणालालता बघा? कसं कसं करायचं याचं? किती मागायचे पैसे? त्यावर लोकसेवक षेख म्हणाले...सांगीतले की दहा रूपये...बघा तुमच्या पध्दतीनं....केलाव का नाय अजुन?.... तक्रारदार संतराम कोते म्हणाले....निघालो बँकेत....किती आणू सांगा?.... लोकसेवक षेख म्हणाले...तुमच्या पध्दतीने लावा हो मेळ....दहाच्या खाली रूपाया घेवू नका....तेच्याकून....ऐकूण घ्या....तुमचा तुमचा खर्च काढा...बाकीचे द्या... त्यावर तक्रारदार संतराम कोते म्हणाले....बिल निघाल्याव दयावं म्हणालतो.... का संगळे आत्ताच म्हणायचे.... लोकसेवक षेख म्हणाले....सगळे आत्ताच म्हणालो की, बिंल टाईप केलेत....आता बिंल निघणार हायत सगळे... त्यावर तक्रारदार संतराम कोते म्हणाले....कुठं थांबणार हाव तुम्ही?... लोकसेवक षेख म्हणाले....मला फोन करा तुम्ही....तेच्याकडून कमी घेवू नका....काय?....तुमचं सारुन बाकीच मला दया.... तुमचं बी खर्च निघाव....त्यावर तक्रारदार संतराम कोते म्हणाले....बंधू हाय ते आपले. तक्रारदार यांनी त्यांना कुठे भेटणार आता असे विचारल्यावर तळणी मध्ये असे लोकसेवक षेख यांनी सांगीतलेवर आम्ही सापळा पथकाच्या वाहनाजवळ परत आलो." अषी हकीकत पंच क्रमांक 01 मनोज गोजमगुंडे यांनी सांगितली. मी, दोन्ही पंचासमक्ष तक्रारदार यांना विचारणा केली असता तक्रारदार यांनी थोडया वेळापुर्वी पंच क्रमांक 01 मनोज गोजमगुंडे यांनी सांगितलेल्या हकीकतीषी मिळती जुळती हकीकत सांगितली. त्यानंतर तक्रारदार संतराम कोते व लोकसेवक षेख यांचे व्हॉईस रेकॉर्डर मधील ध्वनीमुद्रीत झालेले संभाशण पो.अं.1759 कोंडरे यांचे मदतीने चालू करून सर्वांनी ऐकले ते पंच क्रमांक 1 व तक्रारदार यांचे सांगणे प्रमाणे मिळते जुळते असल्याचे दिसून आले.

लोकसेवक षेख यांनी बिल मंजुरीसाठी 10,000/- रुपये लाचेची मागणी केल्याचे व लाच मागणीची रक्कम स्विकारण्यास सहमती दर्षविल्याचे निश्पन्न झाले. त्यानंतर तक्रारदार यांनी त्यांचेजवळील 10,000/-रूपये आमचे समक्ष हजर केले. त्यातील नोटांचे वर्णन घेण्यात आले. त्यानंतर आम्ही तक्रारदार व पंचाना अॅन्थ्रासीन पावडरचा वापर, गुणधर्म याबाबत माहिती व प्रात्यक्षीक करुन दाखविले. तक्रारदार यांनी हजर केलेल्या नोटांना पोकॉ/1256 गंभीरे यांनी अॅन्थ्रासीन पावडर लावुन तक्रारदार यांच्या अंगातील पॅन्टेच्या समोरील उजव्या बाजुच्या खिष्यामध्ये ठेवली. लाचेची रक्कम लोकसेवक षेख यांनी स्विंकारल्यानतर आपल्या गळ्यातील गमजा काढुन तोंड पुसुन झटकावा असा ईषारा करणेबाबत त्यांना सांगण्यात आले. त्यानंतर आम्ही, तक्रारदार दोन्ही पंच व सापळा पथकातील सदस्य यांना पुढील सापळा कार्यवाही बाबत पुन्हा योग्य त्या सुचना दिल्या. त्यापुर्वी लोकसेवक षेख हे सध्या कोठे आहेत

याची माहिती घेण्याकरिता तक्रारदार यांचे मोबाईल फोन वरुन लोकसेवक षेख यांचे मोबाईलवर फोन केला असता, लोकसेवक षेख यांनी तक्रारदार यांना ग्रामपंचायत कार्यालय तळणी ता. रेणापूर येथे येण्यास सांगितले. त्यानंतर पोकॉ/1759 कोंडरे यांचे मार्फतीने 14.39 वा. डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर चालु करुन तक्रारदार यांचे गळयात अडकावुन तळणी ता. रेणापूर येथे पंच क्रमांक 01 मनोज गोजमगुंडे यांच्यासह जाण्यास सांगितले. आम्ही व सापळा पथक मागोमाग तळणी येथील हनुमान मंदिराजवळ सापळा लावून थांबलो. तक्रारदार यांनी लोकसेवक षेख यांना मंदिरा जवळ येण्यास,सांगीतले. त्याठिकाणी तक्रारदार व लोकसेवक यांची भेट झाली व त्यांचेत बोलणे झाल्यानंतर तक्रारदार संतराम कोते यांनी पुर्वनियोजीत लाचस्विकृतीचा इषारा केला. आम्ही, पंच क्र. 02 पठाण व सापळा पथकातील सदस्यासह घटनास्थळी हजर झालो. सापळा पथकाला पाहून लोकसेवक षेख हे पळून जाण्याचा प्रयत्न करीत असताना त्यांना लाचेच्या रक्कमेसह 14.54 वाजणेचे सुमारास पकडून ताब्यात घेण्यात आले. पोकॉ/1759 कोंडरे यांनी तक्रारदार यांचे गळ्यातील व्हाईस रेकॉर्डर काढून घेवून 14.56 वाजता बंद केला.
त्यावेळी आम्ही पंच क्रमांक 01 गोजमगुंडे यांना विचारणा केली असता पंच क्रमांक 01 गोजमगुंडे यांनी सांगीतले की, ताब्यात घेतलेली व्यक्ती ही लोकसेवक षेख असुन त्यांनी मागणी केलेली लाचेची रक्कम उजव्या हाताने स्विकारुन अंगातील पॅन्टच्या उजव्या बाजुच्या पाठीमागील खिष्यामध्ये ठेवल्याचे सांगीतले. आम्ही आमचे ओळखपत्र दाखवून लोकसेवक षेख यांना त्यांचे नाव गांव विचारले असता त्यांनी त्यांचे नाव लोकसेवक गौसपाषा चॉद षेख वय 35 वर्शे, पद- तांत्रीक सहाय्यक, नेमणुक पंचायत समिती, रेणापूर ता. रेणापूर जि. लातूर असे असल्याचे सांगितले. त्यानंतर पंच क्रंमांक 02 पठाण यांनी लोकसेवक षेख यांचे अंगातील गडद हिरव्या रंगाच्या उजव्या बाजुच्या पाठीमागील खिष्यातील लाचेची रक्कम काढुन घेतली. सदर रक्कमेतील नोटांचे वर्णन व पंच क्रमांक 01 गोजमगुंडे यांचे मार्फतीने सापळा कार्यवाही दरम्यान लिहुन घेण्यात आलेल्या नोटांचे वर्णन पडताळून पाहीले असता ते सारखेच असल्याचे निंदषनास आले.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

BALAJI RAMRAO BHANDE(I (Inspector)) / POBN84557 **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.** (गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

पोलीस ठाणे अंमलदार

**Registered by**(नोंदणी अधिकारी)

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची सवाक्षरी)

**Name** (नाव): BALAJI RAMRAO BHA
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.): POBN84557

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

त्यानंतर लोकसेवक षेख यांना ताब्यात घेवुन तेथील आवष्यक ती सापळा कार्यवाही करुन सदर ठिकाणी गर्दी होत असल्याने पुढील कार्यवाही करणेकरीता घटनास्थळावरुन रवाना होवून ला.प्र.वि कार्यालय, लातूर येथे आलो. तेथे पंच क्रमांक 01 मनोज गोजमगुंडे यांना लाच स्विकृती दरम्यान लोकसेवक षेख व तक्रारदार यांचेमध्ये काय बोलणे झाले याबाबत विचारले असता, पंच क्रमांक 01 यांनी सांगीतले की, तक्रारदार यांनी बिला संदर्भात बोलणे केले असता, लोकसेवक षेख यांनी लगेच बिलं ऑनलाईन करू, ऑनलाईन केलं की, ऑनलाईन केल्याच प्रिंट काढून देतो एकदा ऑनलाईन झालं की विशय संपला तुमचा असे सांगीतले. त्यानंतर तक्रारदार यांनी पैसे देवू का? म्हंटल्यानंतर लोकसेवक षेख यांनी काही विशय नाही असे म्हणाल्यावर तक्रारदार कोते यांनी त्यांच्या पॅन्टेच्य खिष्यातील लाचेची रक्कम लोकसेवक षेख यांचे हातात दिली व म्हणाले की, दहा हजार आणलाव. त्यावर लोकसेवक षेख यांनी लोचेची रक्कम त्यांच्या पॅन्टेच्या उजव्या बाजुच्या मागील खिषात ठेवली. मी, दोन्ही पंचासमक्ष तक्रारदार यांना विचारणा केली असता तक्रारदार यांनी थोडया वेळापुर्वी पंच क्रमांक 01 मनोज गोजमगुंडे यांनी सांगितलेल्या हकीकतीषी मिळती जुळती हकीकत सांगितली. त्यानंतर तक्रारदार संतराम कोते व लोकसेवक षेख यांचे व्हॉईस रेकॉर्डर मधील ध्वनीमुद्रीत झालेले संभाशण पो.अं.1759 कोंडरे यांचे मदतीने चालू करून सर्वांनी ऐकले ते पंच क्रमांक 1 व तक्रारदार यांचे सांगणे प्रमाणे मिळते जुळते असल्याचे दिसून आले.

तरी यातील आरोपी लोकसेवक गौसपाषा चॉंद षेख वय 35 वर्शे, पद- तांत्रीक सहाय्यक, नेमणुक पंचायत समिती, रेणापूर ता. रेणापूर जि. लातूर रा. उंबडगा ता. औसा जि. लातूर यांनी तक्रारदार यांचा चुलत भाऊ प्रकाष लक्ष्मण कोते रा.धवेली ता. रेणापूर यांचे मौजे सय्यदपूर ता. रेणापूर .जि. लातूर येथील षेत गट नं. 11 मध्ये महात्मा गांधी राश्ट्रीय रोजगार हमी योजने अंतर्गत मंजुर असलेल्या व ती बांधुन पुर्ण करण्यात आलेल्या विहिरीच्या बिलाची रक्कम तक्रारदार यांचा भाऊ प्रकाष कोते यांचे खात्यावर जमा होण्यासाठी लागणा-या पुर्णत्वाच्या दाखल्यावर सही करण्यासाठी दिनांक 15/06/2026 रोजी 10,000/- रू. लाचेची मागणी करून सदर लाचेची रक्कम लोकसेवक गौसपाषा चॉंद षेख यांनी हनुमान मंदिराचे जवळ रोडवर मौजे तळणी ता.रेणापूर जि. लातूर येथे सुमारे 14.54 वाजता पंचासमक्ष स्वतः स्विकारली असता त्यांना रंगेहात पकडण्यात आले आहे म्हणुन माझी त्यांचेविरुध्द भ्रश्टाचार प्रतिबंध अधिनियम 1988 चे कलम 7 अन्वये सरकारतर्फे कायदेषीर फिर्याद आहे.

(चंद्रकांत माळी)
पोलीस उपअधीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,लातूर

**Attachment to item 7 of First Information Report** (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र)**: Physical features, deformities and other details of the ( If known / seen )**(संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्टये, व्यंग आणि इतर तपशील))

| S.No.(अ.क्र.) | Sex (लिंग) | Date/Year of Birth (जन्म तारीक/ वर्ष) | Build (बांधा) | Height (cms.) (उंची(सें. मी.)) | Complexion (रंग) | Identification Mark (s) (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |

| Deformities/ Peculiarities | Teeth (दात) | Hair (केस) | Eyes (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit(s) (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |

| Language /Dialect (भाषा / बोलीभाषा) | Place Of (का स्थान) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark (भाजल्याच्या खुणा) | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
**(**जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल.**)**